THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 30TH JANUARY 1890.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### रेव्हिन्यू डिपार्टमेंट.

मुक्काम जंजीरे मुंबई, तारीख २४ माहे डिसेंबर सन १८८९.

नं०. ९७२४.—हिंदुस्तानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट नामक सन १८८४ चा आक्ट ४, याच्या ५ व्या कलमावरून दिलेले अधिकार चालवून मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांनीं, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांची अगोदर मंजूरी घेऊन, मुंबई बंदराच्या हद्दींत बारी पदार्थ एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं नेण्यासंबंधीं नियमन करण्याबाबतच्या पढें दिलेल्या कानू केल्या आहेतः—

**कानू.**

बारी पदार्थ एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं नेण्यासंबंधीं नियमन करण्याबाबद गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं केलेल्या ज्या कानू, हिंदुस्तान सरकारचा जाहिरनामा नं०. १४१७, तारीख २४ माहे जून सन १८८७, व मुंबई सरकारचा जाहिरनामा नं०. ३९९६, तारीख २९ माहे जून सन १८८७, यांवरून प्रसिद्ध केल्या आहेत त्यांपैकीं कानू १, २, ३, ४, ५ व ७ ह्या, पुढील कानूंस अनुसरून, मुंबई बंदराच्या हद्दींत बारी पदार्थ एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं नेण्याच्या बाबतींत लागू होतील असें समजावें :

कानू (अ).— कोणत्याहि जहाजावर वजनानें १०० पौंडांहून जास्त बारी पदार्थ मालादाखल असून तें जहाज बंदरीं येईल तेव्हां त्याच्या मास्तरानें, अशा जहाजावर पैलट चढतांच त्याला, त्या जहाजावर सदरीलप्रमाणें बारी पदार्थ असल्याबदल खबर दिली पाहिजे.

कानू (ब).—सेफ्टी काडतुसें, सुरुंग लावण्याकरितां सेफ्टी फूजी, रेलवेच्या धुक्याच्या निशाण्या, व तोट्या हीं खेरीज करून, वजनानें १०० पौंडांहून जास्त असणारे इतर बारी पदार्थ ज्या कोणत्याहि भरसमुद्रांत जाणाऱ्या जहाजावर असतील त्या जहाजानें सदरील बारी पदार्थांनिशीं, मिडल ग्रौंड ब्याटरीच्या पूर्वेकडील बाजूस मुंबई बंदरांतील तारवांपासून अगर मुंबई शहरापासून एक मैल अंतराच्या आंत येऊं नये, आणि अशा हद्दींत कोणत्याहि जहाजानें दुसऱ्या कोणत्याहि जहाजावरून, सेफ्टी काडतुसें, सुरुंग लावण्याकरितां सेफ्टी फूजी, रेलवेच्या धुक्याच्या निशाण्या, व तोट्या हीं खेरीज करून, वजनानें १०० पौंडांहून जास्त असणारे इतर बारी पदार्थ किंवा अशा [पाहिल्या] जहाजावर अगोदर कांहीं बारी पदार्थ असल्यास त्यांसुद्धां ज्यांचें मान वजनानें १०० पौंडांहून जास्त होईल इतके आणखी दुसरे बारी पदार्थ घेऊं नये.

कानू (क).—सेफ्टी काडतुसें सुरुंग लावण्याकरितां सेफ्टी, फूजी, रेलवेच्या धुक्याच्या निशाण्या, व तोट्या हीं खेरीज करून, १०० पौंडांहून जास्त असणारे इतर बारी पदार्थ भरसमुद्रांत जाणाऱ्या ज्या जहाजावर असतील त्या दरेक जहाजावर दिवसास फार-टूकाशीं एक चौरस लाल बावटा लावलेला असला पाहिजे व रात्रीस त्याच ठिकाणीं, कानूबरहुकूम लावावयाच्या दिव्यांखेरीज आगखी एक लाल दिवा असला पाहिजे, आणि सदरीं बाद केलेले बारी पदार्थ खेरीज करून, इतर बारी पदार्थ मुंबई बंदरांत एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं नेण्याच्या कामीं लावलेल्या दरेक जहाजाच्या अगर होडीच्या दरेक बाजूस पाण्याच्या रेषेवर, एक फूट लांबीच्या पांढऱ्या अक्षरांनीं, एकाद्या फळीवर अगर इतर प्रकारें, काळ्या जमिनीवर रंगानें लिहिलेले "बारी पदार्थ" हे शब्द असले पाहिजेत. बारी पदार्थ तारवावरून जमिनीवर उतरण्याच्या अगर तारवावर चढविण्याच्या कामीं लावलेल्या ज्या जहाजांवर व होड्यांवर, सदरीं बाद केलेले बारी पदार्थ खेरीज करून, १०० पौंडांहून जास्त असणारे इतर बारी पदार्थ असतील त्या जहाजांला व होड्यांला ज्या प्रसंगीं नांगरून राहणें जरूर पडेल त्या प्रसंगीं त्यांनीं, बंदरांतील तारवांच्या पूर्वेकडील बाजूस, व अशा तारवांपैकीं कोणत्याहि तारवापासून त्याच्या पूर्वेस अर्ध्या मैलाच्या अंतापलीकडे, नांगरून राहावें.

कानू ( ड ).—संबंध असलेला कंपनी, एजंट अगर इतर असामी यानें, सेफ्टी काडतुसें, सुरुंग लावण्याकरितां सेफ्टी फूजी, रेलवेच्या धुक्याच्या निशाण्या, व तोट्या हीं खेरीज करून, वजनानें १०० पौंडांहून जास्त असणारे इतर बारी पदार्थ ज्या कोणत्या हि जहाजावर असतील तें जहाज बंदरीं येण्याचा अजमास असेल त्यापूर्वीं, किंवा असे कोणतेहि बारी पदार्थ तारवावर चढविण्यापूर्वीं ४८ तास त्याबाबद लेखी सूचना, पोर्ट आफिसरास व वाटर पोलीसच्या सुपरिटेंडेंटास दिली पाहिजे, आणि असे बारी पदार्थ मगझीनमध्यें ठेवण्यांत येत तोपर्यंत अगर ज्या जहाजावर ते असतील तें जहाज सफरीवर जाण्यास निघे तोंपर्यंत ते ताब्यांत ठेवून त्यांवर नजर ठेवण्याकरितां सदरील सुपरिटेंडेंटानें एक स्पेशल अमलदार नेमिला पाहिजे.

कानू ( ई ).—कोणत्याहि एका जहाजांतून अगर होडींतून कोणत्याहि एका वेळीं नेलेले अगर आणलेले एकंदर बारी पदार्थ मिळून ५६० पौंडांहून जास्त असूं नयेत, मात्र अशा जहाजाला अगर होडीला बंद मजला असून तो पोर्ट आफिसरानें पसंत केलेला असला तर ते पदार्थ जास्त असण्यास हरकत नाहीं.

मजल्याच्या कोणत्याहि होडीनें अगर जहाजानें एका वेळीं ५० टनांहून जास्त बारी पदार्थ आणूं अगर नेऊं नये. हा नियम भरसमुद्रांत जाणाऱ्या जहाजांस लागू नाहीं.

कानू ( फ ).—पोर्ट आफिसरास, त्यास योग्य वाटेल त्या प्रसंगीं, कोणतीहि युद्धसामग्री पेट्यांमध्यें योग्य रीतीनें बंद केलेली असून अशा पेट्यांची संख्या ५० हून जास्त नसेल तेव्हां ती, नेहमीच्या नांगरण्याच्या जागीं असणाऱ्या कोणत्याहि जहाजावर, तें जहाज हंकारून जावयाचें असेल त्या दिवशीं अगर त्याच्या पूर्वीच्या दिवशीं, चढविण्याविषयीं परवानगी देण्याचा अख्त्यार आहे. याप्रमाणें युद्धसामग्री तारवावर चढविणें ती, या कानूमध्यें जी सावधगिरी व ज्या शर्ती सांगितल्या आहेत त्याच सावधगिरीनें व त्याच शर्तींवर चढविली पाहिजे. या कानूअन्वयें जी युद्धसामग्री तारवावर चढविण्याविषयीं परवानगी मिळाली असेल ती नेणारी होडी जहाजाच्या बाजूस जातांच ताबडतोब ती सामग्री जहाजावर घेतली पाहिजे, आणि ज्या मालाच्या होडीवर अगर इतर जहाजावर विस्तव असेल त्यास, युद्धसामग्री तारवावर चढविण्यांत येत असतांना, ती जहाजाच्या ज्या बाजूनें चढविली जात असेल त्याच बाजूस राहूं दिलें जाणार नाहीं.

कानू ( ग ).—जर कोणताहि मनुष्य, सदरील कानू ( अ ) तागाईत ( फ ) यांपैकीं कोणतीहि कानू तोडील, तर त्यास दंडाची शिक्षा दिली पाहिजे. व तो दंड एक हजार रुपयेपर्यंत ठरविण्याचा अधिकार आहे.

आलीजा गव्हर्नरसाहेब बहादूर
इन् कान्सिल यांच्या हुकुमावरून,
टी. डी. मेकन्झी,
आक्टिंग चीफ सेक्रेटरी निसबत सरकार.

(True Translation)
Y. M. KELKAR,
Oriental Translator to Government.

## लेजिस्लेटिव्ह डिपार्टमेंट, मुंबई, यामध्यें चालविलेलें काम.

"सन १८८७ चा जुगार खेळण्याची मनाई करण्याविषयींचा आक्ट सुधारण्याविषयींच्या आक्टाचा मसुदा" यावर मुंबईचे आलीजा गव्हर्नर साहेब बहादुर यांच्या कौन्सिलाच्या सिलेक्ट कमिटीचा खालीं दिलेला रिपोर्ट व सिलेक्ट कमिटीनें सुधारला आहे त्याप्रमाणें तो मसुदा हीं, कौन्सिलाच्या सभांत काम कसें चालवावें याबाबदच्या कानूंपैकीं २९ व्या कानूअन्वयें सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं प्रसिद्ध केलीं आहेत:--

**जुगार खेळण्याची मनाई करण्याविषयींचा आक्ट (सन १८८७ चा मुंबईचा ४ था) हा सुधारण्याविषयींच्या आक्टाचा मसुदा (सन १८८९ चा नंबर २) याचा विचार करण्याकरितां नेमिलेल्या सिलेक्ट कमिटीचा रिपोर्ट.**

आह्मी, सन १८८९ चा आक्टाचा मसुदा नंबर २ (जुगार खेळण्याची मनाई करण्याविषयींच्या आक्टाचा मसुदा) याचा विचार करण्याकरितां नेमिलेल्या सिलेक्ट कमिटीचे मेंबर, खालीलप्रमाणें रिपोर्ट सादर करितों:--

१. सदर्हू मसुदा इंग्रजी भाषेंत तारीख १०, आणि मराठी, गुजराथी व कानडी या भाषांत तारीख १९ डिसेंबर सन १८८९ रोजीं प्रसिद्ध केलेला आहे.

२. आह्मांस असें वाटतें कीं सदर्हू मसुदा करण्याचा जो हेतु आहे तो, पैज मारणें या शब्दांचा आक्टांत समावेश होई अशा रीतीनें "जुगार खेळणें" व "जुगार खेळण्याचीं साधनें" या शब्दांच्या व्याख्या दाखल केल्यानें, उत्तम प्रकारें सिद्धीस जाईल.

मुक्काम मुंबई, तारीख २२ वी जानेवारी सन १८९०.

(सही) आर्. वेस्ट,
(") एफ्. एल्. लाथाम,
(") आर्. एम्. सयानी,
(") नौरोसजी एन्. वाडिया.

---

## सन १८८९ चा आक्टाचा मसुदा नंबर २.

**जुगार खेळण्याची मनाई करण्याविषयींचा आक्ट (सन १८८७ चा मुंबईचा आक्ट ४) सुधारण्याबावद आक्टाचा मसुदा.**

ज्या अर्थी सन १८८७ चा मुंबईचा जुगार खेळण्याची मनाई करण्याविषयींचा आक्ट सुधारणें योग्य आहे; त्या अर्थीं खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

१. सदर्हू आक्टाच्या ३ ऱ्या कलमांत "जुगाराचा आखाडा" या संज्ञेच्या व्याख्येपूर्वीं, खालीं दिलेल्या व्याख्या दाखल कराव्या :

या आक्टांत "जुगार खेळणें" ही संज्ञा जेथें जेथें येते तेथें तेथें तींत पैज मारणें या शब्दांचा समावेश होतो. "जुगार खेळणें" यांत पैज मारणें याचा समावेश होतो.

या आक्टांतील "जुगार खेळण्याचीं साधनें" या संज्ञेत जुगार खेळण्याच्या विषयाप्रमाणें किंवा साहित्याप्रमाणें ज्या कोणत्या हि वस्तूचा उपयोग केला असेल त्या वस्तूचा समावेश होतो. "जुगार खेळण्याचीं साधनें" या संज्ञेची व्याख्या.

आलीजा धि रैट आनरेबल धि गव्हर्नर साहेब बहादुर इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून,

जे. जे. हीटन,

मुंबईचे गव्हर्नर साहेब बहादुर यांच्या कायदे व कानू करण्याच्या कौन्सिलाचे सेक्रेटरी.

(True Translation.)

Y. M. KELKAR,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.